# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी व फॅक्स क्रमांक: ०७१२–२५२९९३२


## — : प्रमाणपत्र : —

प्रमाणित करण्यात येत आहे की, ........................................................................................ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांनी विद्यापीठाच्या दि. २५ सप्टेंबर, २००९ च्या परिपत्रकानुसार संपकाळातील एकूण ३६ दिवसांचा कार्यभार भरुन काढलेला आहे.

| अ.क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव | विषय |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

**टिप :–**
अधिव्याख्यानिहाय हमीपत्र, प्रचार्याचे प्रमाणपत्र
व वेळापत्रक दोन प्रतीमध्ये या प्रमाणपत्रासोबत सादर करावेत.

**स्वाक्षरी/–**
**प्राचार्य**

---

प्राचार्यांनी सादर केलेल्या हमीपत्रानुसार, प्राचार्यांनी वरीलप्रमाणे विद्यापीठास सादर केलेल्या प्रमाणपत्रानुसार व विद्यापीठाच्या भरारी पथकाने सादर केलेल्या अहवालानुसार असे प्रमाणित करण्यात येते की, ......................... .......................................................... या महाविद्यालयातील वरील अधिव्याख्यात्यांनी संपकाळातील एकूण ३६ दिवसांचा कार्यभार भरुन काढला आहे.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

C:\My Documents\PATHAK FILE.doc

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१ दुरध्वनी व फॅक्स क्रमांक २५२९९३२


क्र.म.वि./२०३९
दिनांक:– ०८ मार्च, २०१०.

## –: परिपत्रक :–

प्रति,

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत सर्व प्राचार्य व महाविद्यालयाचे संचालन करणाऱ्या शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव**

विषय :– मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व महाविद्यालयातील (अशासकीय अनुदानीत/विनाअनुदानीत/कायम विना अनुदानीत) प्राचार्य व अधिव्याख्यात्यांची पदे नियमित स्वरुपात भरण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ३० जानेवारी, २०१० रोजी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–२००९/(४३५/०९)/विशि–३ निर्गमित करुन मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार राज्यातील सर्व महाविद्यालयांनी प्राचार्य आणि शिक्षकांची पदे **दिनांक ३१ मे, २०१०** पूर्वी भरण्याचे आदेश दिले आहेत. या शासन निर्णयाची प्रत सोबत संलग्न केली आहे. शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षकांची रिक्त पदे विहीत मुदतीत भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळाची राहील. विहीत मुदतीत प्राचार्य/ शिक्षकांची रिक्त पदे न भरणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द विद्यापीठ मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २२१६ मध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करेल. यामध्ये प्रथम वर्षात विद्यार्थी प्रवेशावर बंदी, विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी न देणे व महाविद्यालयाच्या असंलग्नीकरणाची प्रक्रीया सुरु करणे इत्यादी कार्यवाही टप्प्या टप्प्याने करण्यात येईल. प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून प्राचार्य आणि संस्था चालकांनी या शासन निर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन करुन शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयातील रिक्त असलेली प्राचार्य आणि शिक्षकांची पदे **दिनांक ३१ मे, २०१०** पूर्वी भरण्याची कार्यवाही करावी.

महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षकांची पदे भरण्याकरीता विद्यापीठ स्तरावरुन देखील कार्यभारप्रमाणे पदे भरण्याकरीता ना–हरकत प्रमाणपत्र देणे, पदांचे आरक्षण निश्चित करुन देणे, निवड समित्यांवर विषयतज्ञ नामित करणे व महाविद्यालयांनी सादर केलेल्या निवड समितीच्या कार्यवृत्ताप्रमाणे प्राचार्य/शिक्षकांना मान्यता देणे इत्यादी कार्यवाही करण्यात येते. विद्यापीठाकडून करावयाची वरील कार्यवाही कालबध्दरित्या पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक विद्यापीठाने ठरविले आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी आपल्या प्रस्तावासंबंधी खालील वेळापत्रकाप्रमाणे विद्यापीठाकडून ना–हरकत प्रमाणपत्र व आरक्षण निश्चित करुन घ्यावे.

– २ –

| अ. क्र. | जिल्हा/ विद्याशाखा | निर्धारीत केलेला कालावधी | वेळ |
|---|---|---|---|
| १) | अभियांत्रिकी महाविद्यालये | १० व ११ मार्च,२०१० | सकाळी १०—३० वाजतापासून |
| २) | औषधीनिर्माण व विधी महाविद्यालये | १२ मार्च, २०१० | |
| ३) | शिक्षण महाविद्यालये | १५ मार्च,२०१० | |
| ४) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(नागपूर शहर)** | १८, १९ व २० मार्च, २०१० | |
| ५) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(नागपूर ग्रामिण)** | २२ मार्च,२०१० | |
| ६) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(वर्धा व भंडारा जिल्हा )** | २३ मार्च,२०१० | |
| ७) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(गडचिरोली व गोंदिया जिल्हा)** | २५ मार्च,२०१० | |
| ८) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(चंद्रपूर जिल्हा )** | २६ मार्च,२०१० | |

**यापूर्वी नजीकच्या काळात ज्या महाविद्यालयांना प्राचार्य/शिक्षकांची पदे भरण्याकरीता ना—हरकत प्रमाणपत्र, आरक्षण निश्चिती व निवड समित्या दिल्या असतील परंतु महाविद्यालयांनी ही पदे काही कारणास्तव भरली नसतील तर अशा पदांच्या बाबतीत यापूर्वी दिलेले ना—हरकत प्रमाणपत्र, आरक्षण निश्चिती, निवड समिती कायम असल्याचे समजून त्वरीत निवड प्रक्रीया पूर्ण करुन विद्यापीठाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावेत. असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठाने निवड समिती देवून देखील महाविद्यालयांनी मुलाखती घेतल्या नाहीत आणि मुलाखती झाल्यानंतर सुध्दा वेळेवर कार्यवृत्त पाठविले जात नाही. मुलाखती घेतल्यानंतर योग्य उमेदवार मिळत नाही अशा सबबी महाविद्यालय सांगतात यापैकी कोणतीही सबब विद्यापीठ ग्राहय धरणार नाही व विद्यापीठाने मुदतीमध्ये कार्यक्रम देवूनही जर प्राचार्य व शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर त्यास विद्यापीठ कोणत्याही परिस्थीतीत जबाबदार राहणार नाही व अशा परिस्थीतीत मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासन निर्णयानुसार महाविद्यालयावर कडक कार्यवाही करण्यात येईल.**

**वरील वस्तुस्थिती विचारात घेवून सर्व प्राचार्य आणि संस्था अध्यक्षांना मा.कुलगुरुंच्या आदेशानुसार निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षकांची रिक्त पदे दि. ३१ मे, २०१० पूर्वी भरावीत. जी महाविद्यालये/संस्था रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणार नाहीत त्यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ कार्यवाही करेल याची नोंद घ्यावी.**

**सदर पत्र विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

आपला विश्वासू

(डॉ.अ.दौ.चौधरी)
संचालक (म.वि.वि.म.)

प्रतिलीपी माहितीकरीता,

१. मा.कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
२. मा.प्र—कुलगुरु , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३. मा.प्रधान सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२.
४. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे— ४११ ००१.
५. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, जुने मॉरीस कॉलेज, नागपूर

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर—४४० ००१ दुरध्वनी व फॅक्स क्रमांक २५२९९३२


क्र.म.वि./३७/१० दिनांक:— ०८ मार्च, २०१०.

### संलग्नीत महाविद्यालयांकरीता जाहीर सूचना

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ३० जानेवारी, २०१० रोजी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२००९/(४३५/०९)/विशि—३ निर्गमित करुन मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षकांची पदे **दिनांक ३१ मे, २०१०** पर्यंत भरण्याकरीता विद्यीपीठाला सूचना दिल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ स्तरावरुन देखील कार्यभाराप्रमाणे पदे भरण्याकरीता ना—हरकम प्रमाणपत्र देणे, पदांचे आरक्षण निश्चित करुन देणे, निवड समित्यांवर विषयतज्ञ नामित करणे व महाविद्यालयांनी सादर केलेल्या निवड समितीच्या कार्यवृत्ताप्रमाणे प्राचार्य/ शिक्षकांना मान्यता देणे इत्यादी कार्यवाही करावयाची आहे. विद्यापीठाकडून करावयाची वरील कार्यवाही कालबध्दरित्या पूर्ण करण्यासाठी या पदांना ना—हरकत प्रमाणपत्र व आरक्षण निर्धारीत करण्याकरीता पुढीलप्रमाणे वेळापत्रक विद्यापीठाने ठरविले आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी आपल्या प्रस्तावासंबंधी खालील वेळापत्रकाप्रमाणे विद्यापीठाकडून ना—हरकत प्रमाणपत्र व आरक्षण निश्चित करुन घ्यावे.

| अ. क्र. | जिल्हा/ विद्याशाखा | निर्धारीत केलेला कालावधी | वेळ |
|---|---|---|---|
| ९) | अभियांत्रिकी महाविद्यालये | १० व ११ मार्च,२०१० | सकाळी १०—३० वाजतापासून ५—४० पर्यंत |
| १०) | औषधीनिर्माण व विधी महाविद्यालये | १२ मार्च, २०१० | |
| ११) | शिक्षण महाविद्यालये | १५ मार्च,२०१० | |
| १२) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(नागपूर शहर)** | १८, १९ व २० मार्च, २०१० | |
| १३) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(नागपूर ग्रामिण)** | २२ मार्च,२०१० | |
| १४) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(वर्धा व भंडारा जिल्हा )** | २३ मार्च,२०१० | |
| १५) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(गडचिरोली व गोंदिया जिल्हा)** | २५ मार्च,२०१० | |
| १६) | कला,वाणिज्य, विज्ञान समाजविज्ञान व गृहविज्ञान महाविद्यालये **(चंद्रपूर जिल्हा )** | २६ मार्च,२०१० | |

**यापूर्वी नजीकच्या काळात ज्या महाविद्यालयांना प्राचार्य/शिक्षकांची पदे भरण्याकरीता ना—हरकत प्रमाणपत्र, आरक्षण निश्चिती व निवड समित्या दिल्या असतील परंतु महाविद्यालयांनी ही पदे अद्यापपर्यंत भरली नसतील तर अशा पदांच्या बाबतीत यापूर्वी दिलेले ना—हरकत प्रमाणपत्र, आरक्षण निश्चिती, निवड समिती कायम असल्याचे समजून त्वरीत निवड प्रक्रीया पूर्ण करुन विद्यापीठाकडे लगेच मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावेत.**

असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठाने निवड समिती देवून देखील महाविद्यालये मुलाखती घेत नाहीत आणि मुलाखती झाल्यानंतर सुध्दा वेळेवर कार्यवृत्त विद्यापीठास पाठविले जात नाही. मुलाखती घेतल्यानंतर योग्य उमेदवार मिळत नाही अशा सबबी महाविद्यालय सांगतात यापैकी तीनही सबबी विद्यापीठ ग्राहय धरणार नाही व विद्यापीठाने मुदतीमध्ये कार्यक्रम देवूनही महाविद्यालयात/संस्थेत जर प्राचार्य व शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत तर त्यास विद्यापीठ कोणत्याही परिस्थीतीत जबाबदार राहणार नाही व अशा परिस्थीतीत मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासन निर्णय दि. ३० जानेवारी, २०१० नुसार महाविद्यालयावर कडक कार्यवाही करण्यात येईल. याची महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

याबाबत महाविद्यालयाला पाठविण्यात आलेले परिपत्रक विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ